जा. क्र. प्रपिवियो./सां. ८/म.मं.अधि/५२१/२०१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११००१ दिनांक :२१ सप्टेंबर, २०१८

प्रति,

विभागीय सांखिक,
द्वारा,
विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय (सर्व)

विषय : प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत पिके व विमा क्षेत्र घटक अधिसूचित करणेबाबत ...

संदर्भ : १.या कार्यालयाचे अ.शा. प्रत्र क्र ३४७, दि २२.०६.२०१८.
२.या कार्यालयाचे अ.शा. प्रत्र क्र ३४८, दि २२.०६.२०१८.
३. या कार्यालयाचे अ.शा. प्रत्र क्र ४१४, दि ३०.०७.२०१८.
४. राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीची बैठक दिनांक १७/९/२०१८.

राज्यात खरीप हंगाम २०१६ पासून केंद्र शासनाची महत्वाकांक्षी प्रधानमंत्री पिक विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यातील रब्बी/उन्हाळी हंगामातील ८ पिके अधिसूचित करण्यात आली आहेत. सदर योजनेची अंमलबजावणी राज्यात महसूल मंडळ, महसूल मंडळ गट, तालुकास्तरावर विमा क्षेत्र घटक अधिसूचित करुन करण्यात येते. या योजनेंतर्गत पिके व विमा क्षेत्र घटक अधिसूचित करण्याचे अधिकार मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीस आहेत.

संदर्भ क्र.१ अन्वये खरीप व रब्बी हंगामासाठी संदर्भ क्र.२ व ३ अन्वये तसेच दिनांक ७/०८/२०१८ ते १०/०८/२०१८ आणी ३०/०८/२०१८ ते ०१/०९/२०१८ रोजी कृषि आयुक्तालयात घेतलेल्या आढावा सभेमध्ये जिल्हयातील रब्बी हंगामातील विविध पिकाखालील क्षेत्राचा महसुल मंडळ निहाय आढावा घेवुन विमा क्षेत्र घटक अधिसूचित करण्यासाठी जिल्हयाचा परिपूर्ण संयुक्त स्वाक्षरीसह प्रस्ताव सादर करणेबाबत मार्गदर्शन करुन सुचित करण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने जिल्हयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचे अधिन राहून नव्याने/स्वतंत्र अधिसुचित तसेच वगळावयाचे महसुल मंडळ/ मंडळगट / तालुका याबाबतचे प्रस्ताव तयार करुन दि. १७/०९/२०१८ रोजी झालेल्या राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीच्या आढावा बैठकीत मंजुरीस सादर केले आहेत. सदर अधिसुचित करावयाचे प्रस्ताव माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत. आपण सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात यावी. सदर अधिसुचित करावयाचे विमा क्षेत्र घटकाचा तपशील कृषि विभागाचे संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

सोबत : वरील प्रमाणे

21.9.18
कृषि संचालक (वि.प्र.)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे

प्रत : मा.अपर मुख्य सचिव, कृषि व पणन विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रतिलिपी :- माहिती तथा कार्यवाहीस्तव.

१. मा. जिल्हाधिकारी, (सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)